# अर्थ व प्रशासन विभाग,
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जाक्र./अप्रवि/अंसेनियो/ 2633 /२०१८
दिनांक: 26 /०३/२०१८

स्मरण पत्र –०२

प्रति,

आहरण व संवितरण अधिकारी,
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला/नागपुर

विषय:– राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे D.D.O. Form भरून पाठविणेबाबत.
संदर्भ:–१)परिपत्रक क्रं. जा.क्रं. अप्रवि/अंसेनियो/२२६१/२०१८, दि. ०१.०२.२०१८.
२)जाक्र./अप्रवि/अंसेनियो/२३७३/२०१८ दिनांक: २१/०२/२०१८

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भ क्रं. ०१ नुसार सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात आले होते की, दि. ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर विद्यापीठाअंतर्गत ज्या आस्थापनेवर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे सभासद कार्यरत असतील त्या सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे D.D.O. Form भरून या कार्यालयास दि. १० फेब्रुवारी, २०१८ पर्यंत ०३ प्रतित पाठविण्याचे परिपत्रकाद्वारे कळविले होते. उपरोक्त कार्यवाही जलदगतीने होण्याकरीता संदर्भ क्रं. ०२ नुसार सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना अंतिम तारीख २८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत पाठविण्याचे स्मरणपत्र ०१ नुसार पुन्हा सुचित केले होते.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठातील विविध विभाग, कार्यालये, संशोधन केंद्रे व इतर आस्थापनेवरिल काही आहरण व संवितरण अधिकारी यांनी विहीत नमुन्यामध्ये माहिती अद्यापर्यंत भरून पाठविलेली नाही. तरी सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सदर स्मरण पत्र ०२ नुसार पुन्हा सुचित करण्यात येते की, दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत उपरोक्त कार्यवाही न झाल्यास संबंधित कार्यालयाचे वेतन व आकस्मिक देयके पारीत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील याची दक्षता घ्यावी.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलिपि:
१. मा. कुलगुरू यांचे स्वीय सहायक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

स्वा –
नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

DCPS COVERING LETTER